

# श्री स्वामी कृपातीर्थ तारक मंत्र

निःशंक हो । निर्भय हो । मना रे ।
प्रचंड स्वामी बळ पाठीशी रे ।
अतर्क्य अवधूत हे स्मरणगामी ।
अशाक्यही शक्य करतील स्वामी ।।
जिथे स्वामी पाय तिथे न्यून काय ।
स्वये भक्त प्रारब्ध घडवी हि माय ।
आज्ञेविण काळ ना नेई त्याला ।
परलोकिही ना भीती तयाला ।।
उगाची भितोसी भय हे पळू दे ।
जवळी उभी स्वामिशक्ती कळू दे ।
जगीं जन्ममृत्यू असे खेळ ज्यांचा ।
नको घाबरु । तू असे बाळ त्यांचा ।।
खरा होई जागा श्रध्देसहीत ।
कसा होशि त्यावीण तू स्वामीभक्त।
कितींदा दिला बोल त्यांनीच हात
नको डगमगू स्वामी देतील साथ।।
विभूती नमन नाम ध्यानादि तीर्थ ।
स्वामीच या पंचप्राणामृतांत ।
हे तीर्थ घे । आठवी रे । प्रचीती ।
न सोडी कदा स्वामी ज्या घेई हाती ।
।। श्री अक्कलकोट स्वामी समर्थ चरणाऽविंदार्पणमस्तु ।।
।। अनंत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगिराज
श्री सद्‌गुरु अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज की जय ।।

<u>स्वामी कृपातीर्थ घेण्याची पध्दत</u>

हा श्लोक म्हणत असताना उदबत्तीची
विभुती भांडयातील पाण्यात पडू द्यावी
नंतर हे तीर्थ सर्वांनी घ्यावे